राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देण्याची योजना राबविण्यास मंजूरी देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः राखते२०११/प्र.क्र.२८३/१७अे**
**हुतात्मा राजगुरू चौक,मादाम कामा रोड,**
**मंत्रालय, विस्तार,मुंबई-४०० ०३२**
**तारीख: ७ सप्टेंबर,२०१३**

**प्रस्तावना :-**

सध्या रासायनिक खतांच्या किंमती वाढलेल्या आहेत. रासायनिक खतांच्या सततच्या वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत आहे. पिकांची उत्पादकता व जमिनीची सुपीकता, आरोग्य सुधारण्यासाठी जैविक खतांचा वापर वाढविणे आवश्यक आहे. एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनात जैविक खतांच्या वापरास अनन्य साधारण महत्व आहे. त्याकरिता जैविक खतांचे उत्पादन व वापर या बाबीस प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. यासाठी राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देण्याची योजना राबविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

पिकाची उत्पादकता व जमिनीची सुपीकता, आरोग्य सुधारण्यासाठी जैविक खताचा वापर वाढविणे आवश्यक आहे. त्याकरिता जैविक खतांचे उत्पादन व वापर याबाबीस प्रोत्साहन देण्यासाठी खालील प्रमाणे राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देण्याची योजना राबविण्याच्या नविन राज्य योजनेस शासन मंजूरी देण्यात येत आहे.

**योजनेचा उद्देश:-**

कृषि उत्पादनात जैविक खतांचा वापर वाढविणे व शासकीय/निमशासकीय/खाजगी क्षेत्रात जैविक खत उत्पादनास चालना देणे हे या योजनेचा उद्देश आहे.

सदर योजने अंतर्गत शासकीय/निमशासकीय संस्थांना जैविक खत उत्पादन युनिट उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचप्रमाणे खाजगी क्षेत्रातील नोंदणीकृत संस्थांनाही उत्पादन युनिट उभारणीसाठी अर्थसहाय्य उपलब्ध राहील. सदरची योजना राबवितांना ज्या जिल्हयात एकही युनिट नाही त्या जिल्हयाला आधी मंजूरी देण्यात येईल

**प्रस्तावित योजना:-**

प्रस्तुत योजना प्रकल्पाधारित स्वरुपात राबविण्यात येईल. जैविक खत उत्पादन युनिटची वार्षिक उत्पादन क्षमता १५०मे.टन असणे आवश्यक राहील व उत्पादन युनिट कमीत कमी ५ वर्ष सुरू राहील, जैविक खत उत्पादनासाठी आवश्यक यंत्र सामुग्री खरेदी करणे, प्रयोगशाळेतील काच सामान, रसायने,कच्चामाल पॅकिंग मटेरियल इत्यादी खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाईल. वार्षिक १५० मे.टन जैविक खत उत्पादन क्षमतेचे युनिट उभारणीसाठी अंदाजे रु.१००.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. राज्य शासनाच्या औद्योगीक धोरणा अंतर्गत देय अनुदान लक्षात घेता अनुदानाची एकूण मर्यादा २५ टक्के पर्यंत मर्यादित राहील. यापेक्षा जास्तीचा खर्च संबंधित संस्थांनी करावयाचा आहे.

प्रकल्प मंजूरी ही संचालक(निविष्ठा व गुणनियंत्रण) कृषि आयुक्तालय,पुणे यांचे कडून देण्यात येईल तसेच संबंधित जिल्हयाचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत अमंलबजावणीची कार्यवाही करण्यात येईल.

**प्रस्तावित योजना राबविण्यासाठी खालील प्रमाणे अटी शर्ती राहतील:-**

१.जैविक खत उत्पादन युनिटची वार्षिक उत्पादन क्षमता १५० मे.टन इतकी असणे आवश्यक राहील.

२. अनुदान मंजूरी नतंर एक वर्षाच्या आत प्रत्यक्ष उत्पादन सुरु करणे आवश्यक राहील.

३. सदर उत्पादन क्षमता अनुदान मंजूरी नतंर कमीत कमी ५ वर्ष सुरू ठेवणे आवश्यक राहील.

४. मंजूर अनुदान फक्त यंत्र सामुग्री, काच सामान, रसायने, कच्चा माल, पॅकिंग साहित्य इत्यादी खरेदी करण्याकरीता वापरता येईल. अनुदानित रकमेचा उपयोग इमारत बांधकाम जागा खरेदी करणे,वीज व पाणी इत्यादी बाबींसाठी वापरता येणार नाही.

**योजनेचे लाभार्थी व अनुदान दर:-**

या योजनेत शासकीय/निमशासकीय /खाजगी नोंदणीकृत संस्था हे लाभार्थी राहणार असून जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस राज्य शासनाच्या औद्योगिक धोरणा अंतर्गत देय अनुदान लक्षात घेता अनुदानाची एकूण मर्यादा २५ टक्के पर्यंत मर्यादित राहील. प्रकल्प मंजूरी नतंर संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कडून दोन हप्त्यात अनुदान अदा करण्यात येईल.

**अनुदान वितरण कार्यप्रणाली:-**

संस्थेस मंजूर झालेले २५ टक्के अनुदान हे क्षेत्रिय कार्यालयामार्फत दोन टप्प्यात वितरीत करण्यात येईल. उत्पादन युनिट करीता आवश्यक इमारत उपलब्ध असल्यास किंवा भाडे तत्वावर घेतली असल्यास मंजूर अनुदानाच्या ५० टक्के रक्कम क्षेत्रीय कार्यालयामार्फत वितरीत करण्यात येईल. उर्वरित ५० टक्के अनुदान रक्कम आवश्यक यंत्र सामुग्री व इतर साहित्य खरेदीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

अनुदान रक्कम अदा करण्यापुर्वी संबंधित संस्थेकडून रु.१०० च्या स्टॅम्प पेपरवर सदर युनिट कमीत कमी ५ वर्ष कार्यरत राहील याबाबतचा करारनामा करुन घेण्यात येईल. उत्पादन युनिट कमीत कमी ५ वर्ष चालू न ठेवल्यास अदा केलेले अनुदान रक्कम शासनास परत करण्यात येईल. अशी अट करारनाम्यामध्ये घालण्यात येईल.

अनुदान अदायगीसाठी प्रकल्प (युनिट) तपासणी व अनुदान शिफारस करण्यासाठी समिती गठीत करण्यात येईल. या समितीचे कृषि उपसंचालक(खते) प्रमुख राहतील तर कृषि विद्यापीठाचे व नॅशनल सेंटर फॉर ऑरगॅनिक फार्मिंग (एन.सी.ओ.पी) नागपूर यांचे प्रतिनिधी व संबंधित जिल्हयाचे विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील तंत्र अधिकारी हे सदस्य राहतील.

**लाभार्थी निवडीचे निकष:-**

लाभार्थी निवडीचे निकष खालील प्रमाणे राहतील.

१. लाभार्थी संस्था कंपनी कायद्यांतर्गत/एसएसआय युनिट म्हणून नोंदणीकृत असणे आवश्यक राहील.

२. राज्यातील ज्या जिल्हयात जैविक खत उत्पादन युनिट अस्तित्वात नाही त्या जिल्हयास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

३. या योजनेअंतर्गत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस शासन अंगीकृत संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

**जैविक खताची गुणवत्ता निकष, विक्री व निकष पुर्ण न करणाऱ्यांवरील कारवाई:-**

शासनाने अर्थसहाय्य केलेल्या युनिट मध्ये गुणवत्तापुर्ण जैविक खत उत्पादन करण्यासाठी उत्पादन स्थळीच गुणनियंत्रण प्रयोगशाळा सुविधा असणे बंधनकारक राहील. तसेच शेतकऱ्यांना वितरीत होणाऱ्या जैविक खतांचे नमुने शासनाच्या गुणनियंत्रण विभागामार्फत काढण्यात येतील. अप्रमाणित नमुन्यांवर कायद्यातंर्गत करवाई करण्यात येईल. उत्पादन केलेल्या जैविक खताची विक्री/वाटप विविध शासकीय योजनांतर्गत तसेच खुल्या बाजारात विक्री करण्याची मुभा संबंधित उत्पादकास राहील. याबाबत शासनाची जबाबदारी राहणार नाही. ज्या युनिट कडून जैविक खतांच्या उत्पादनामध्ये गुणवत्तेचे निकष राखले जाणार नाहीत त्यांचे विरुध्द नियमानुसार कारवाई करण्यात येईल. जैविक खत उत्पादन व विक्रीसाठी राज्य शासनाच्या निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाकडून परवाना घेणे बंधंनकारक राहील.

**प्रस्तावित निधी:-**

ही योजना सन २०१३-१४ ते २०१७-१८ या पाच वर्षासाठी राबविण्यात येईल. वार्षिक १५० मे.टन जैविक खत उत्पादन क्षमतेचे युनिट उभारणीसाठी लाभार्थी संस्थांना राज्य शासनाच्या औद्योगिक धोरणा अंतर्गत देय अनुदान लक्षात घेता अनुदानाची एकूण मर्यादा २५ टक्के पर्यंत देय राहील.

सन २०१३-१४ मध्ये रु.२५०.०० लक्ष व सन २०१३-१४ ते सन २०१७-१८ या पाच वर्षाच्या कालावधी साठी रु.१२५०.०० लक्ष इतक्या रकमेच्या प्रस्तावित निधीच्या तरतुदीस मान्यता देण्यात येत आहे. सदर योजना त्या त्या वर्षी उपलब्ध असलेल्या नियत व्ययाच्या मर्यादेत राबविण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०९०७१६५०३७९३०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vasave Akusing N

Digitally signed by Vasave Akusing N
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Agri & ADF, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Vasave Akusing N
Date: 2013.09.07 16:51:18 +05'30'

(आ.न.वसावे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
२. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
४. मा.राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव

५. मुख्य सचिव यांचे उपसचिव
६. अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
७. अपर मुख्य सचिव (नियोजन),नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई-४०००३२
८. प्रधान सचिव (वित्त),वित्त विभाग मंत्रालय,मुंबई-४०००३२
९. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. महालेखापाल(लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
११. सर्व विधान मंडळ सदस्य, विधान भवन मुंबई
१२. सर्व राजकीय पक्षाची मुख्य कार्यालये
१३. संचालक(निविष्ठा व गुणनियंत्रण ), कृषि आयुक्तालय, पुणे
१४. सर्व संचालक/सहसंचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
१५. महासंचालक,माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मत्रालय, मुंबई
१६. सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१७. सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१८. सर्व जिल्हा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
१९. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानसभा सचिवालय ग्रंथालय, विधानभवन मुंबई (२ प्रती)
२१. उपसचिव (निविष्ठा व गुणनियंत्रण), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२२. उपसचिव (अर्थसंकल्प), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२३. वित्त विभाग/व्यय-१, अर्थसंकल्प-१३
२४. नियोजन विभाग/१४३१
२५. सर्व कक्षअधिकारी/अवर सचिव, कृषि व पदुम विभाग
२६. निवडनस्ती

/

जा.क्र.राखते/गुनि ३-४/अर्थसहाय्य/५१५ /१३
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे - ४११ ००१, दिनांक : १४ ऑक्टोबर २०१३

**प्रति,**

**विभागीयक कृषि सहसंचालक**
**____________________ (सर्व)**

**विषय : राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देणेबाबतच्या मार्गदर्शक सुचना.**

**संदर्भ :** शासन निर्णय क्रमांकः राखते२०११/प्र.क्र.२८३/१७अे, दिनांक : ७ सप्टेंबर २०१३

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार, राज्य पुरस्कृत योजने अंतर्गत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देणेबाबतच्या योजनेस मंजूरी देण्यात आलेली आहे. याबाबतच्या मार्गदर्शक सुचना आपणास माहितीसाठी कळविण्यात येत आहेत. मार्गदर्शक सुचनानुसार आपल्या विभागातून या योजने अंतर्गत ज्या जिल्ह्यात जैविक खत उत्पादन युनिट अस्तित्वात नाहीत अशा जिल्ह्यातील कमीत कमी दोन प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे कडून मागविण्यात यावेत. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी सादर केलेल्या प्रस्तावांची आपले स्तरावर काळजी पुर्वक तपासणी व छाननी करावी. व परिपुर्ण असेच प्रस्ताव कृषि आयुक्तालयास मंजूरी करीता सादर करावेत.

सोबत : मार्गदर्शक सुचना, करारनामा व
प्रकल्पासोबत सादर करावयाची विहित नमुन्यातील १२ प्रपत्रे

**कृषि संचालक (निवगुनि)**
**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-१**

**प्रत,**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

## राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देणेबाबतच्या मार्गदर्शक सुचना.

राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देण्याच्या योजनेस शासन निर्णय क्रमांक : राखते २०११/प्र.क्र.२८३/१७अे, दिनांक : ७ सप्टेंबर २०१३ नुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. या योजनेबाबतच्या मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे राहतील.

प्रस्तुत योजना प्रकल्पाधारित स्वरुपात राबविण्यात येईल. सदरची योजना सन २०१३-१४ ते २०१७-१८ या पाच वर्षासाठी राबविण्यात येईल. या योजनेतील प्रकल्पास कृषि संचालक (निवगुनि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे मार्फत मंजूरी देण्यात येईल. तसेच संबंधित जिल्ह्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत योजनेची अमंलबजावणी करण्यात येईल. सदरच्या योजनेअंतर्गत जैविक खत उत्पादन युनिट उभारण्यासाठी खालील प्रमाणे अटी व शर्ती राहतील.

१. जैविक खत उत्पादन युनिटची वार्षिक उत्पादन क्षमता १५० मे.टन इतकी असणे आवश्यक आहे.

२. अनुदान मंजुरीनंतर एक वर्षाच्या आत प्रत्यक्ष उत्पादन सुरु करणे आवश्यक राहिल.

३. सदर उत्पादन युनिट अनुदान मंजूरी नंतर कमीत कमी ५ वर्षे सुरु ठेवणे आवश्यक आहे.

४. मंजूर अनुदान फक्त यंत्र सामुग्री, काचसामान, रसायने, कच्चा माल, पॅकिंग साहित्य इत्यादी खरेदी करणे करिताच वापरता येईल. अनुदानित रक्कमेचा उपयोग इमारत बांधकाम, जागा खरेदी करणे, वीज व पाणी इत्यादी बाबींसाठी वापरता येणार नाही.

५. प्रस्तावित प्रकल्प राष्ट्रियकृत बँक कर्जाशी संलग्न असावा.

या योजनेत शासकीय/ निमशासकीय व खाजगी नोंदणीकृत संस्था हे लाभार्थी राहणार असून लाभार्थींची निवड खालील निकषाप्रमाणे राहील.

१. लाभार्थी संस्था कंपनी कायद्यांतर्गत/ एसएसआय युनिट म्हणून नोंदणीकृत असणे आवश्यक राहिल.

२. राज्यातील ज्या जिल्ह्यात जैविक खत उत्पादन युनिट अस्तित्वात नाही त्या जिल्ह्यास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

३. या याजनेअंतर्गत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस शासन अंगीकृत संस्थांना प्राधान्य देण्यात येईल.

राज्यशासनाच्या औद्योगिक धोरणांतर्गत देय अनुदान लक्षात घेता अनुदानाची एकूण मर्यादा २५ टक्के पर्यंत किंवा प्रकल्प खर्चाच्या २५ टक्के या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम देय राहिल. प्रकल्प मंजूरीनंतर संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत दोन हप्त्यात अनुदान अदा करण्यात येईल.

मंजूर झालेले २५ टक्के अनुदान क्षेत्रिय कार्यालयामार्फत दोन टप्यात वितरीत करण्यात येईल. मंजूर अनुदानाच्या ५० टक्के रक्कम उत्पादन युनिट करीता आवश्यक इमारत उपलब्ध असल्यास/ किंवा भाडे तत्वावर घेतली असल्यास संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयामार्फत वितरीत करण्यात येईल. उर्वरित ५० टक्के रक्कम आवश्यक यंत्र सामुग्री व इतर साहित्य खरेदीची प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

अनुदान रक्कम अदा करण्यापूर्वी संबंधित संस्थेकडून रुपये १०० च्या स्टॅम्प पेपरवर सदर युनिट कमीत कमी ५ वर्ष कार्यरत राहिल याबाबतचा नोटराईज्ड करारनामा करुन घेण्यात येईल. उत्पादन युनिट ५ वर्ष चालू न ठेवल्यास अदा

केलेल्या संपुर्ण अनुदानाची रक्कम शासनास परत करणे संबंधित उत्पादकावर बंधनकारक राहिल. व याचा समावेश करारनाम्यात असणे आवश्यक राहिल.

अनुदान अदायगीसाठी प्रकल्प युनिट तपासणी व अनुदान शिफारस करण्यासाठी कृषि उपसंचालक (खते) यांचे अध्यक्षतेखालील समिती गठीत करण्यात आली आहे. या समितीचे सदस्य कृषि विद्यापीठ, नॅशनल सेंटर फॉर ऑरगॅनिक फार्मिंग (एन.सी.ओ.पी.) नागपूर यांचे प्रतिनिधी व संबंधित जिल्ह्याचे विभागीय कृषि सहसंचालक कार्यालयातील तंत्र अधिकारी हे सदस्य आहेत. समितीने तपासणी अहवाल व देय अनुदानाची शिफारस केल्यानंतर अनुदान मंजूर करण्यात येईल.

शासनाने अर्थसहाय्य केलेल्या युनिट मध्ये गुणवत्ता पुर्ण जैविक खताचे उत्पादन होणे आवश्यक आहे. त्या करिता उत्पादनस्थळी गुणनियंत्रण प्रयोगशाळा असणे बंधनकारक राहिल. उत्पादकाने बॅचची साईज योग्य ठेवावी. उत्पादित होणारी जैविक खते खत नियंत्रण अद्यादेश १९८५ मधील परिशिष्ठ ३ मध्ये नमूद केलेल्या मापदंडाप्रमाणे व भारतीय मानक ब्युरोच्या मानकाप्रमाणे असावीत.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अॅझोटोबॅक्टर | आयएस | ९१३८-२००२ |
| २ | रायझोबियम | आयएस | ८२६८-२००१ |
| ३ | स्फुरद विरघळणारे जिवाणू | आयएस | १४८०७-२००० |
| ४ | अॅझोस्पिरिलम | आयएस | १४८०६-२००० |

शेतकऱ्यांना वितरीत होणाऱ्या जैविक खतांचे नमुने शासनाच्या गुणनियंत्रण विभागामार्फत काढण्यात येतील. अप्रमाणित नमुन्यावर कायद्यांतर्गत कारवाई करण्यात येईल.

उत्पादन केलेल्या जैविक खतांची विक्री व वाटप प्रचलित नियमानुसार विविध शासकीय योजनांतर्गत तसेच खुल्या बाजारात विक्री करण्याची मुभा संबंधित उत्पादकास राहिल. सदर उत्पादित झालेल्या खतांची विक्री करण्याबाबत संपुर्ण जबाबदारी ही उत्पादकावर राहील. विक्री बाबतची कोणतीही जबाबदारी शासनावर राहणार नाही.

जैविक खत उत्पादन व विक्री खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत येत असल्याने राज्यशासनाच्या निविष्ठा व गुणनियंत्रण विभागाकडून उत्पादन व विक्रीसाठी परवाना घेणे बंधनकारक राहिल.

राज्य पुरस्कृत जैविक खत उत्पादन युनिट उभारणीस अर्थसहाय्य देणे योजने अंतर्गत प्रस्ताव जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांचे मार्फत सादर करावा. प्रस्ताव सादर करताना मार्गदर्शक सुचना मध्ये नमूद केलेल्या बाबीनुसार व प्रपत्रांनुसार प्रस्ताव सादर करावा.

१. प्रकल्पाचे नाव व पत्ता

२. अर्जदाराचा तपशील : प्रपत्र १ प्रमाणे द्यावा.

३. प्रकल्पाच्या प्रास्ताविकाबाबत सविस्तर तपशिल द्यावा.

४. प्रकल्पाचे व्यापारी भवितव्या बाबतचा सविस्तर तपशिल द्यावा.

५. प्रकल्पाचा उद्देशा बाबतचा सविस्तर तपशिल द्यावा.

६. प्रकल्पासाठी आवश्यक पायाभूत सुविधा व साधन सामग्री बाबतचा तपशील द्यावा.

अ) जमीन (स्वतःची असल्यास ७/१२ उतारा किंवा भाड्याने घेतल्यास लीज अॅग्रीमेंट जोडावे.), जागेचे क्षेत्र कमीत कमी २० आर तारेच्या कुंपणासह असावे.

ब) इमारत व इमारतीचा आराखडा - ३००० चौ. फुट इमारत आवश्यक राहिल.

क) इमारत भाड्याने घेतली असल्यास इमारतीचे रजिस्टर्ड लीज डॉक्युमेंट (कमीत कमी ५ वर्षाचे) सादर करावे.

ड) इमारतीचा प्लॅन/ आराखडा व पुर्णत्वाचा दाखला प्रकल्प प्रस्तावा सोबत सादर करावा.

इ) इमारत ग्रामपंचायत/ नगरपालिका/ महानगरपालिका हद्दीत असल्यास संबंधित संस्थेचे ना हरकत प्रमाण पत्र असणे आवश्यक राहिल.

फ) वार्षिक १५० मे.टन उत्पादन क्षमतेचे जैविक खत उत्पादन युनिट उभारणीसाठी आवश्यक यंत्र सामुग्री (उत्पादनास लागणारी व प्रयोग शाळेतील साहित्यासह) सोबत जोडलेल्या प्रपत्र - २ प्रमाणे राहिल.

७. पायाभूत सुविधा :

अ) वीज पुरवठा - ३ फेज जोडणी आवश्यक राहिल. १५० मे.ट वार्षिक उत्पादन क्षमतेसाठी ७० अश्वशक्ती एवढा वीज पुरवठा आवश्यक आहे. त्याबाबतचा तपशिल सोबत जोडावा.

ब) पाणी पुरवठा - जैविक खत उत्पादनासाठी पाण्याची उपलब्धता आवश्यक असल्याने पाणी पुरवठ्याची सोय असणे आवश्यक आहे. त्याचा तपशिल देण्यात यावा.

क) एअर कॉम्प्रेसर - जैविक खत उत्पादनासाठी फरमेंटेशन, निरजंतुकीकरण व स्वच्छता या साठी तसेच निरनिराळी यंत्रे चालविण्यासाठी एअर कॉम्प्रेसरची आवश्यकता आहे. कॉम्प्रेसरची क्षमता, मेक यांचा तपशिल द्यावा.

८. मनुष्य बळाबाबतची माहिती सोबत जोडलेल्या प्रपत्रामध्ये देण्यात यावी.

९. उत्पादनाची पद्धत व तंत्रज्ञानाचा स्त्रोत - प्रत्येक जैविक खताची उदा. अॅझोटोबॅक्टर, रायझोबियम इत्यादी उत्पादन निहाय उत्पादनाची फ्लो डायग्रॅम द्यावी.

१०. जैविक खताच्या मल्टप्लीकेशनची स्किमॅटीक डायग्रॅम देण्यात यावी.

११. जैविक खत उत्पादन प्रकल्प अहवालासोबत प्रकल्पाचा अंदाजपत्रकिय खर्च, अर्थसंकल्पिय मुल्यांकन, अर्थशास्त्रीय विश्लेषण, वित्तीय तरतूद, नफा खर्चाचे गुणोत्तर इत्यादी बाबतची माहिती सोबत सहपत्रित केलेल्या प्रपत्रामध्ये सादर करावी. सदरची प्रपत्रे सी. ए. कडून प्रमाणित केलेली असावी.

१२. प्रकल्पासाठी अर्थसहाय्य देणाऱ्या राष्ट्रीयकृत बँकेचे नाव, पत्ता व खाते क्रमांक देण्यात यावा.

**कृषि संचालक (निवगुनि)**
**कृषि आयुक्तालय, म.रा. पुणे-१**